**<u>फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २७२ व २७७ नुसार न्यायालयीन</u>**

**<u>भाषा मराठीत पुरावा</u>**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०२ याची शपथेवर साक्ष</u>**

मी शपथपुर्वक निवेदन करतो कीः

माझे नावः गणेश पंढरीनाथ झिटे,

वयः ५० वर्षे, व्यवसायः नोकरी, जवान ब.क्र.२९,

राहणारः अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड.

**<u>सरतपासणी अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. ए. एल. पवार यांचे मार्फत सुरु.</u>**

०१. दिनांक १७/१२/२०२३ रोजी मी राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक क्र.०१ अलिबाग येथे कार्यरत होतो. त्यादिवशी आम्हाला मिळालेल्या खात्रीलायक बातमीवरुन माझे वरिष्ठ निरीक्षक श्री. गावडे, इतर कर्मचारी, मी व दोन पंच मिळुन शासकीय वाहनाने मौजे सांगळे येथे गेलो. तेथे गेल्यानंतर आम्ही मिळालेल्या बातमीप्रमाणे एका राहते घरी छापा टाकला असता तेथे एक व्यक्ती त्याचेसमोर रबरी टयुब घेवुन संशयास्पद हालचाल करताना आम्हाला आढळला. मी त्याला जागीच थांबवले. त्यानंतर आम्ही पंचांसमक्ष त्याचे ताब्यातील टयुबची पाहणी केली असता त्यामध्ये आम्हाला गावठी हातभटटीची ४० लिटर दारु मिळाली. त्यापैकी प्रत्येकी १८० मिली दारु दोन काचेच्या बॉटलमध्ये सि.ए. परिक्षणाकरीता वेगळी सिलबंद करुन त्यावर श्री. गावडे व पंचांच्या सहयाचे लेबल लावण्यात आले. श्री. गावडे यांनी सदर मुददेमाल ताब्यात घेवुन तेथे पंचनामा तयार केला. त्यांनी आरोपीला फौ.प्र.सं. कलम ४१ अन्वये नोटीस देवुन सोडले. त्यानंतर आम्ही सदर व्यक्तीकडे चौकशी केली असता त्याने त्याचे नाव परशुराम

ठमा मोरे रा. सांगळे असे सांगितले. पुढे आरोपी, जप्त मुददेमाल व नमुन्यासह आम्ही कार्यालयात परत आलो. तेथे मी घटनेचे अनुषंगाने फिर्याद दिली. त्यावर माझी सही असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१७** देण्यात येतो. मी आरोपीला ओळखतो. तो आज न्यायालयात हजर आहे.

सरतपास पूर्ण.

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. ए.पी. दांडेकर यांचेमार्फत**

०२. हे म्हणणे खरे आहे की, मिळालेली गोपनिय माहिती प्रत्यक्ष मिळाली होती किंवा फोनद्वारे याबाबत मजकुर, घटनेचेवेळी आमचेसोबत हजर असलेल्या कर्मचा-यांची किंवा पंचांची नावे याबाबी, माझे फिर्यादीमध्ये मजकुर नमुद नाही, माहिती व्यक्तीचे नावानिशी मिळाली नव्हती, मिळालेल्या माहितीची पडताळणी करण्याकरीता बनावट ग्राहक मोक्यावर पाठविला नव्हता, आम्ही पंचांची व पंचांनी आमची अंगझडती घेतली नव्हती. आम्ही कार्यालयातुन निघतेवेळी आमचे शासकीय वाहनाचे नोंद स्टेशन डायरीला नोंद केली होती. हे म्हणणे खरे आहे की, नमुद स्वरुपाची नोंद केल्याबाबत माझे फिर्यादीमध्ये मजकुर लिहलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, कथीत घटनास्थळ खुली मोकळी जागा आहे, तेथे कुणीही येवु जावु शकते.

०३. हे म्हणणे खरे नाही की, मोक्यावर आम्हाला जप्त मुददेमाल बेवारस स्थीतील मिळाला होता, त्याचाच श्री. गावडे यांनी पंचनामा तयार केला, त्यापैकी सि.ए. परिक्षणाकरीता नमुने सिलबंद करण्यात आले, बेवारस मुददेमालाचे आधारे खोटी फिर्याद दिली, घटनेचेवेळी आम्हाला आरोपीचे ताब्यात रबरी टयुबमध्ये ४० लिटर दारु मिळाली नव्हती, मी सरतपासणीमध्ये सांगितल्याप्रमाणे कुठलीही घटना घडली नाही, मी आज न्यायालयात खोटी साक्ष दिली.

उलटतपासणी पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

SUNIL SAKHARAM MAHALE
Digitally signed by SUNIL SAKHARAM MAHALE
Date: 2025.02.11 17:52:50 +0530

स्थळ : रोहा. (एस. एस. महाले)

दि.११.०२.२०२५. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, रोहा.